लोकमत

# गुन्हे दाखल झालेल्या १५० जणांना मिळाले मोफत वकील

## नऊ महिन्यांतील आकडेवारी : २०६ प्रकरणांत गरजूंना वकिलांची मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : गुन्हे दाखल झालेल्या गरजू आरोपींना आता तज्ज्ञ फौजदारी वकिलाच्या नियुक्तीकरिता पैसे खर्च करण्याची गरज नाही. ते गोंदिया जिल्हा विधिसेवा प्राधिकरणामार्फत मोफत फौजदारी वकील मिळवून दिला जातो. १३ मार्च २०२३ पासून गोंदियाच्या जिल्हा सत्र न्यायालयात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशान्वये कायदेशीर मदत संरक्षण सल्लागार प्रणाली (एलएडीसीएस) राबविली जात आहे. या नऊ महिन्यांत फौजदारी गुन्ह्यात अडकलेल्या तब्बल १५० आरोपींना, तर दिवाणीच्या २०६ प्रकरणांत जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाने मोफत वकील मिळवून दिला आहे.

गोंदियातील आरोपींना न्यायालयात वकील लावण्यासाठी पैसे नसले तरी त्या आरोपींना जिल्हा विधिसेवा प्राधिकरणाकडून मोफत वकील दिला जातो. त्यासाठी फौजदारी कायद्यांमध्ये निष्णांत असलेल्या ५ लोकअभिरक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.






### कोणाला मिळतो मोफत वकील?

मोफत वकील मिळविण्यासाठी उच्च न्यायालय विधिसेवा उपसमितीकडे अर्ज सादर करावा लागतो. गोंदियात ५ निष्णात विधितज्ज्ञांची निवड करण्यात आली. लोकअभिरक्षक कार्यालयात सध्या पाच फौजदारी विधिज्ञ कार्यरत आहेत. ते गरजू आरोपींचे वकील म्हणून काम करतात.

### कोणत्या सेवेसाठी मिळतात वकील?

विधिसेवेकरिता लोकअभिरक्षक उपलब्ध करून दिले जातात. त्यामध्ये पीसीआर, एमसीआर, अटकपूर्व जामीन, नियमित जामीन, खटल्यामध्ये बचाव इत्यादी विधिसेवांचा समावेश आहे. गरजू आरोपींना अटक होण्यापूर्वीपासून ते खटला दाखल झाल्याच्या टप्प्यापर्यंत वकील मिळतो. आरोपींना आता तज्ज्ञ फौजदारी वकिलाच्या नियुक्तीकरिता पैसे खर्च करण्याची गरज नाही. त्यासाठी जिल्हा विधिसेवा प्राधिकरणामार्फत मोफत फौजदारी वकील मिळतो.

### ११ महिन्यांत १५० जणांना मिळाले मोफत वकील

प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी न्यायालयात शिक्षा झाल्यास सत्र न्यायालयात अपील दाखल करण्यासाठी लोकअभिरक्षकांची मोफत सेवा दिली जाते; परंतु प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचल्यास, मोफत वकील मिळविण्यासाठी उच्च न्यायालय विधिसेवा उपसमितीकडे अर्ज सादर करावा लागतो. 'एलएडीसीएस'अंतर्गत १५० आरोपींना अवघ्या नऊ महिन्यांत मोफत वकील देण्यात आले आहेत.

गरजू आरोपींना गुणवत्तापूर्ण विधिसेवा प्रदान करणे आणि कोणताही आरोपी स्वत:चा प्रभावी बचाव करण्यापासून वंचित राहू नये, हा लोकअभिरक्षक प्रणालीचा उद्देश आहे. ही प्रणाली यशस्वीपणे कार्य करीत आहे. गोंदिया जिल्ह्याच्या लोकअभिरक्षक कार्यालयाला गेल्या १३ मार्चपासून सुरुवात झाली. दरम्यान, या कार्यालयाने शेकडो प्रकरणांतील आरोपींना लोकअभिरक्षकांची सेवा दिली.

- शकलेश व्ही. पिंपळे, सचिव, जिल्हा विधिसेवा प्राधिकरण गोंदिया

### काय आहे 'एलएडीसीएस' योजना?

आधी दिवाणी व फौजदारी प्रकरणांसाठी स्वतंत्र वकील नव्हते. दोन्ही प्रकारच्या प्रकरणांमध्ये गरजू व्यक्तींना नियमित पॅनेलमधूनच वकील दिले जात होते. नियमित पॅनेलमधील वकील खासगी वकिलीही करू शकतात. त्यामुळे ते विधिसेवा प्रकरणांना आवश्यक वेळ देऊ शकत नाहीत. अनेकदा त्यांच्या उपलब्धतेचाही प्रश्न उपस्थित होतो. परिणामी, विधिसेवा प्रणाली आणखी बळकट करण्याची गरज निर्माण झाली होती. त्यातून राष्ट्रीय विधिसेवा प्राधिकरणाने फौजदारी प्रकरणांसाठी स्वतंत्र लोकअभिरक्षक प्रणाली लागू केली.